# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक १९/११/२०१८ रोजी (का.प.क्र.१४) संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

सोमवार दिनांक १९/११/२०१८ रोजी (का.प.क्र.१४) मा.सभापती श्री.रेणुकादास(राजु) दत्तोपंत वैद्य यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महापालिका कार्यालयातील मलिक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी ११:३५ वाजता वंदेमातरम् या गिताने सुरु झाली. सभेला मा.अतिरिक्त आयुक्त,श्री.श्रीकृष्ण भालसिंग, नगर सचिव,श्री.दिलीप सुर्यवंशी व संबंधित अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

०१. स.स.श्री.गजानन रामकिसन बारवाल
०२. स.स.श्रीमती राखी प्रशांत देसरडा
०३. स.स.श्री.सय्यद मतीन रशीद
०४. स.स.श्रीमती खान सायराबानो अजमल
०५. स.स.श्रीमती जयश्री सुरेंद्र कुलकर्णी
०६. स.स.श्रीमती खान नसरीन बेगम समद यारखान
०७. स.स.श्रीमती शिल्पाराणी सागरअप्पा वाडकर
०८. स.स.श्री.अब्दुल नविद अब्दुल रशीद

श्री.गजानन बारवाल : १०० कोटी रस्त्याच्या कामासाठी मंजुरी दिल्या नंतर प्रशासनाने सांगितले होते की, डिफर पेमेंटच्या कामाला सुरुवात करु त्याचे काय झाले?

मा.सभापती : १०० कोटीच्या रस्त्याला मंजुरी देत असतांना डिफर पेमेंटवरील रस्ते सुध्दा तातडीने व्हायला पाहिजे असे सुचना दिल्या होत्या त्याची काय परिस्थिती आहे. खुलासा करावा.

कक्ष प्रमुख (तांत्रिक) : सन २०१८-१९ डीएसआर मधे बदल झाला दरात बदल नुसार प्रक्रीया करुन रिवाईज टेंडर तीन दिवसात निविदा काढावी.

श्री.गजानन बारवाल : त्वरित उशीर होत आहे. राहिलेले काम आचारसहिता लागण्या अगोदर करण्याचे आदेशित करावे.

मा.सभापती : डिफर पेमेंटच्या रस्त्याच्या बाबतीत पुढच्या आठवड्यात कुढल्याही परिस्थितीत निविदा प्रक्रिया पुर्ण झाली पाहिजे. अनेक वार्डातले प्रस्ताव प्रशासनाकडे येऊन पडलेले आहे प्रस्तावांना स्थायी समितीची मंजुरी घ्यावी.

श्रीमती.जयश्री कुलकर्णी : त्रिमुर्ती चौकामध्ये जो कचरा डंम्प केला जातो त्या बाबत वृत्तपत्रामध्ये खुप मोठी बातमी आलेली आहे. त्रिमुर्ती चौकामध्ये आरोग्य केंद्र, शाळा, वाचनालय आहे तरी सुध्दा तिथे कचरा डंम्प केला जातो. प्रशासन याकडे लक्ष देत नाही. आणि रिलायन्स मॉल समोर सुध्दा कचरा डंम्प केला जातो.

घनकचरा प्रमुख : तीन दिवसात त्रिमुर्ती चौकातला कचरा साफ केला जाईल आणि रिलायन्स मॉलचा पुर्ण कचरा ड्रायवेस्ट असल्यामुळे थोडा वेळ लागेल.

श्रीमती.शिल्पाराणी वाडकर : माझ्या वार्डातील ओपन स्पेसमध्ये टाकलेल्या कचऱ्याला आग लागली होती. प्रत्येक ओपन प्लॉटवर कचऱ्याचे ढिग साचलेले आहे त्यांना ताबडतोब नोटिस देण्यात यावी की, तुमची जागा स्वच्छ ठेवा.

मा.सभापती : कचरा कोणताही असो शहरात डम्प करु नये पुर्ण शहर स्वच्छ झाले पाहिजे. जे डीपीआरमध्ये ठरले, मंजुर आहे आणि जे मा.उच्च न्यायालयाने निर्देश दिले आहेत त्या पध्दतीने काम होणे अपेक्षित आहे. कुठल्याही वार्डात कचरा रस्त्यावर दिसता कामा नये. ज्या जागा शासनाने नेमुन दिलेल्या जागा आहेत त्या ठिकाणी कचरा डंम्प केला जावा. डिसेन्ट्रलाईज ९ साईटवर कचरा प्रोसेस मशीन बसवावे

श्रीमती.जयश्री कुलकर्णी :त्रिमुती चौकात एक महिन्यापासुन सुलभ शौचालय बंद आहे.त्याचा खुलासा करण्यात यावा.

कार्य.अभियंता(ड्रेनेज) :वार्ड इंजिनिअर बरोबर जाऊन पाहणी करतो आणि लवकरात लवकर ते काम चालु करतो.

श्रीमती.सायरा बानो : वार्ड क्र.२३ शहागंजमध्ये कचऱ्याचे तीन शेड आहे. लोक कचऱ्याला आग लावत आहे. दहा दिवस झाले कचरा उचलण्यात आलेला नाही.

घनकचरा कक्ष प्रमुख : शेड काढण्यात आले आहे. यासाठी पथक नेमण्यात आले आहे. कार्यवाही केली जाईल.

श्री.गजानन बारवाल : बाबा पेट्रोल पंप ते रेल्वेस्टेशन रस्त्याचे डांबरीकरण कधी करणार आहे.

कक्ष प्रमुख (तांत्रिक) : निविदा काढलेली आहे. काही भागातले काम झाले आहे. परंतु प्रशासकीय मान्यता जी विभागीय आयुक्त कार्यालयातुन घ्यायची होती मान्यता घेण्यासाठी प्रस्ताव पाठवलेला आहे. तो शासनाकडे गेला. स्वतंत्र अधिकारी नेमुन पाठपुरावा केला जाईल.

मा.सभापती : या आठवड्यामध्ये काम चालु करावे

श्री.गजानन बारवाल : दिवाळीच्या पिरीयड मध्ये किती बिल काढले. किती ठेकेदाराची बिले बाकी आहे. ठेकेदार बिल मिळत नसल्याने नवीन काम घेण्यास तयार नाही. योग्य नियोजन असावे.

मा.सभापती : जो निधी आहे तो समान पध्दतीने वाटप करण्यात यावा.

श्री.गजानन बारवाल : एमएसईबीला केबल टाकण्याचे परवानगी दिली. त्याप्रमाणे काम होत नाही. जेसीबीने काम केले अनेक भागात पाणी, विद्युत व ड्रेनेज लाईन तुटल्या. माझ्या वार्डात काम केले. डी.पी. यांचे घरापासुन पुढे काम न करता अर्धवट ठेवले.

मा.सभापती :वाटेल त्या पध्दतीने रस्ते खेदता येणार नाही त्याना ताकीद द्यावी. ज्या भागात काम चालु करणार आहे त्या संबंधी त्या वार्डाचे स.सदस्य यांना कल्पना दिली जावी. विश्वासात घ्यावे. रस्ता दुरुस्त करुन देणार नसेल तर कार्यवाही करावी.

कक्ष प्रमुख (तांत्रिक) : मनपाच्या परवानगी शिवाय एमएसईबी कोणतेही खोदकाम करु शकत नाही. जी परवानगी दिली त्यानुसार काम करता येईल.

श्रीमती.शिल्पाराणी वाडकर : फायर एनओसी बाबत अहवाल वाचल्यास असे लक्षात आले की, चार ठिकाणी अंतिम फायर एनओसी चे पूर्वी तपासणीसाठी ठेवा असा शेरा दिला होता परंतु तपासणीचा अहवाल सादर न करता अंतिम फायर एनओसी दिलेली आहे. यामध्ये ६(११) हे प्रकरण आहे. CTC No.12877/A/17 जालना रोड औरंगाबाद त्याच्यामध्ये अग्नीशामन विभागाने स्थळ पाहणी केली व ए-फार्म नुसार अंतिम एनओसी देण्यात आलेली आहे. सादर करणात अंतिम मान्यता आहे का? आणि ती फाईल वर घेतली आहे का? सादरीकरणात मान्यतेचा शेरा का नाही.

प्र.अग्नीशामन अधि. : शासनाने जे फार्म ठरवुन दिलेले आहे त्या प्रमाणे एजन्सीकडुन फार्म घेत असतो त्या नुसार एनओसी नेमतो.

मा.सभापती : तपासणी अहवालास मान्यता घेतलेली आहे का? असा स.सदस्यांचा प्रश्न आहे.

श्रीमती शिल्पाराणी वाडकर : स्थळ पाहणी करुन मान्यता देता.की नाही तसे फाईलवर नमुद नसते.

प्र.अग्नीशामन अधि : फाईलवर लिहिलेले आहे.

मा.सभापती : लिहिलेले असेल तर अहवालामध्ये का आले नाही. ऑडिटर मॅडम यांचे म्हणणे आहे की, मान्यता घेतलेली आहे. नेमके काय प्रकरण आहे याबाबत खुलासा करा.

मुख्य लेखा परिक्षक : ऑडिट करते वेळेस मान्यता घेतली नव्हती. नंतर जो खुलासा दिला होता तो अर्धवट आला होता.

मा.सभापती : प्रत्येक प्रकरणात अर्धवट खुलासा दिला आहे असे त्यांचे मत आहे. आठ दिवसाच्या आत सगळ्या प्रकरणात लेखी स्वरुपात मुख्य लेखा परीक्षक त्यांना ८ दिवसात खुलासा देण्यात यावा त्यांचे जर समाधान झाले नाही तर तुमच्यावर कारवाई होईल.

श्रीमती वाडकर : संत एकनाथ नाट्य गृहाचे काम का होत नाही.

कक्ष प्रमुख (तांत्रिक) : कामाचा प्रोग्राम तयार करावा लागले. अगोदर इलेक्ट्रीकलचे काम करावे लागते त्यानंतर सिव्हीलचे काम करावे लागेल.

मा.सभापती : पीएमसी नेमुन निवीदा प्रोसेस सिव्हील वर्कचे कामही तातडीने करावे.

**विषय क्र. १२० :**

मा.आयुक्त यांच्या मान्यतेने प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शिक्षण विभागात कार्यरत असलेल्या काळानुरूप भरती केलेल्या घड्याळी तासिका तत्वावरील माध्यमिक शिक्षकांना मा.स्थायी समिती मंजुर ठराव क्रमांक २१० दिनांक ११/०१/२०१८ नुसार जा.क्र.मनपा/शिक्षण/२०१८/५७, दि.२५/०१/२०१८ रोजीच्या आदेशान्वये दिनांक ०६/११/२०१८ ते दिनांक ३०/०४/२०१८ पर्यंत दर २९ दिवसांनी एक दिवसाचा तांत्रिक खंड देवून तात्पुरती नियुक्ती / मुदतवाढ देण्यांत आलेली आहे.

सद्यस्थितीत खालील काळानुरूप भरती केलेले घड्याळी तासिका तत्वावरील माध्यमिक शिक्षक कार्यरत आहेत.

| अ.क्र. | शाळेचे नाव | तासिका तत्वावरील शिक्षकांचे नांव | शैक्षणिक पात्रता | अध्यापनाचे विषय | एक महिन्याच्या कमाल ७२ तास |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | मा.वि.बेगमपुरा | श्रीमती सुलाखे नीलीमा | बी.ए.बी.एड. | इंग्रजी | ७२ तास |
| ०२. | मा.वि.मिटमिटा | श्री.म्हस्के दिनेश जगन्नाथ | बी.एस्सी बी.एड. | विज्ञान | ७२ तास |
| ०३. | मा.वि.मिटमिटा | श्रीमती खरात नीता मोतीराम | बी.ए.बी.एड. | मराठी | ७२ तास |
| ०४. | मा.वि.किराडपुरा नं.१ | श्री.खान शहबाज खुदायार खान | एम.ए.बी.एड. | उर्दु | ७२ तास |
| ०५. | मा.वि.नारेगाव उर्दु | श्री.शेख जफर | बी.एस्सी बी.एड. | विज्ञान | ७२ तास |
| ०६. | मा.वि. शहाबाजार | श्रीमती पटेल हुमैरा अ.बारी | बी.एस्सी बी.एड. | गणित | ७२ तास |
| ०७. | मा.वि.सिडको एन-७ | श्री.जाधव व्यंकट भिमराव | बी.ए.बी.एड. | इंग्रजी | ७२ तास |
| ०८. | मा.वि.नारेगाव | श्री.श्रीकांत किसनराव शिंदे | एम.एस्सी बी.एड. | विज्ञान | ७२ तास |
| ०९. | मा.वि.नारेगाव | श्री.मिर्झा अजमल बेग | एम.ए. बी.एड. | इंग्रजी | ७२ तास |
| १०. | मा.वि.मुकुंदवाडी | श्रीमती सुरेखा द. आक्षे | बी.एस्सी बी.एड. | विज्ञान | ७२ तास |
| ११. | मा.वि.मुकुंदवाडी | श्रीमती पट्टेबहादुर अर्चना नामदेव | बी.ए.बी.एड. | मराठी | ७२ तास |
| १२. | मा.वि.प्रियदर्शनी इंदिरानगर | श्री.इंगळे प्रकाश विष्णु | बी.ए.बी.एड. | इंग्रजी | ७२ तास |
| १३. | मा.वि.प्रियदर्शनी इंदिरानगर | श्रीमती जाधवर सुर्यमाला महादेव | बी.ए.बी.एड. | हिंदी | ७२ तास |
| १४. | मा.वि.बन्सीलालनगर | श्रीमती काळे मनिषा रंगनाथ | बी.ए.बी.एड. | इंग्रजी | ७२ तास |
| १५. | मा.वि.बन्सीलालनगर | कु.भडके ताई नारायण | बी.ए.बी.एड. | मराठी | ७२ तास |
| १६. | मा.वि.नारेगाव मराठी | श्रीमती फुलंब्रीकर अरूणा प्रभाकर | बी.एस्सी. बी.एड. | गणित | ७२ तास |
| १७. | मा.वि.बनेवाडी | श्री.सोनवणे राजेंद्र कडुबा | बी.एस्सी. बी.एड. | गणित | ७२ तास |
| १८. | मा.वि.इंदिरानगर बायजीपुरा | श्रीमती चव्हाण शुभांगी बलभिमराव | एम.ए.बी.एड. | मराठी | ७२ तास |
| १९. | मा.वि.हर्सुल (म.) | श्री.मोकळे संजय शंकर | बी.ए. बी.एड. | इंग्रजी | ७२ तास |
| २०. | मा.वि.हर्सुल (म.) | श्रीमती भिलेगांवकर प्रेरणा | बी.ए. बी.एड. | मराठी | ७२ तास |
| २१. | मा.वि.मुकुंदवाडी | श्रीमती कुलकर्णी स्वाती प्रल्हादराव | बी.ए. बी.एड. | मराठी | ७२ तास |

उपरोक्त सर्व घड्याळी तासिका तत्वावरील माध्यमिक शिक्षकांना रू.९०/- प्रती घड्याळी तास याप्रमाणे मानधन अदा करण्यात येते. सदर मानधन खुप तुटपुंजे असल्याने मानधन वाढीबाबत वारंवार मागणी होत आहे. त्यामुळे संबंधीताच्या मानधनात रू.१८०/- प्रती घड्याळी तास याप्रमाणे मानधन वाढ करण्यास प्रशासकीय मान्यता झाली आहे. त्याबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीसमोर ठेवण्यात आलेला आहे. मान्यता असल्यास दि.१८/०९/२०१८ पासून रू.१८०/- प्रती घड्याळी तास प्रमाणे मुदतवाढ करणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

वरीलप्रमाणे कमाल तासांची मर्यादा ठरवुन दिलेली आहे. त्यापेक्षा कोणत्याही घड्याळी तासिका तत्वावरील माध्यमिक शिक्षकांचे जास्तीचे मानधन अदा केले जाणार नाही. याची जबाबदारी संबंधीत

मुख्याध्यापकांची राहील. याशिवाय शिक्षकांनी काही अतिरिक्त तास घेतल्यास त्याची स्वतंत्र नोंद मुख्याध्यापक हे ठेवतील व तशी शिक्षणाधिकारी यांची मान्यता घेतल्यानंतरच मानधन अदा करण्यात येईल.

वरील कर्मचाऱ्यांना सन २०१८-२०१९ च्या शैक्षणिक वर्षातील प्रथम सत्रात प्रशासकीय मान्यतेने मा.स्थायी समितीच्या मान्यतेच्या अधिन राहून दि.१५/०६/२०१८ ते दि.१३/०७/२०१८, दि.१५/०७/२०१८ ते १२/०८/२०१८, दि.१४/०८/२०१८ ते १५/०८/२०१८ व दि.१८/०८/२०१८ ते १५/०९/२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

वरील कर्मचाऱ्यांना सन २०१८-२०१९ च्या शैक्षणिक वर्षातील दर २९ दिवसांनी एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दिनांक १८/०९/२०१८ ते (दिवाळीच्या सुट्ट्या लागेपर्यंत) दिनांक ०३/११/२०१८ पर्यंतची मुदतवाढ देण्याबाबतचा तसेच उपरोक्त मुदतवाढीस कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

मा.सभापती : विषय क्र.१२०

श्री.गजानन बारवाल : यामध्ये तारखेचा घोळ काय आहे? याचा खुलासा घ्यावा.

शिक्षणाधिकारी : यामध्ये असे लिहिलेले आहे की, वरील कर्मचाऱ्यांना सन २०१८-१९ च्या शैक्षणिक वर्षातील दर २९ दिवसांनी एक दिवसाचा तांत्रिक खंड देवुन १८.०९.२०१८ ते दिवाळीच्या सुट्टया लागेपर्यंत ०३.११.२०१८ पर्यंतची मुदतवाढ देण्याबाबत हा प्रस्ताव ठेवलेला आहे.

मा.सभापती : यामध्ये तारीख बरोबर आहे की नाही ते बघुन घ्यावे.

मा.अति.आयुक्त : यामध्ये प्रिंटींग मिस्टेक झालेल्या असेल ते तपासुन घ्यावे.

शिक्षणाधिकारी : हे याच वर्षातले आहे.

मा.सभापती : तारखेच्या संदर्भात जे काही प्रिंटींग मिस्टेक आहेत ते दुरुस्ती करुन दुरुस्तीसह या प्रस्तावाला मंजुरी देण्यात येते.

श्रीमती.राखी देसरडा : काही शाळेत विद्यार्थ्यांची संख्या अत्यंत कमी आहे. शाळेंमध्ये विद्यार्थी कमी आणि शिक्षक जास्त आहे आणि काही शाळेंमध्ये शिक्षक जास्त आणि विद्यार्थी संख्या कमी आहे. यावर काही विचार झाला आहे का नाही?

शिक्षणाधिकारी : यामध्ये दोन ते तीन शाळेंची संख्या कमी आहे. त्याबद्दल त्याची संचिका प्रस्तावित केलेली आहे. मान्यता झाल्या नंतर त्या शाळा क्लप करु. जिथे शिक्षक कमी तिथे शिफ्टची सुध्दा ऑर्डर काढलेली आहे.

श्रीमती.शिल्पाराणी वाडकर : उस्मानपुऱ्यातील महानगरपालिकेच्या शाळेमध्ये २० विद्यार्थी सुध्दा नाहीत आणि पाच शिक्षक आहेत. वृत्तमान पत्रामध्ये बातमी आली होती की शाळेचा गेट चोरीला गेला. तिथे दारुड्यांचा अड्डा झाला आहे. शाळेची अवस्था कचरा कुंठी सारखी झाली आहे.

मा.सभापती : यामध्ये तातडीने लक्ष द्यावे.

श्रीमती.जयश्री कुलकर्णी : गारखेडा परिसरातील उर्दु माध्यमाच्या शाळेमध्ये शिक्षकांची संख्या कमी आहे.

शिक्षणाधिकारी : गारखेडा उर्दु माध्यमाच्या शाळेमध्ये बालवाडीच्या शिक्षकांची संख्या कमी आहे. पाच शिक्षिकांची भरती करण्याची प्रक्रिया चालु आहे.

मा.सभापती : लवकरात लवकर ते करण्यात यावे. विषय क्र.१२० आणि १२७ मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शिक्षण विभागात कार्यरत असलेल्या काळानुरूप भरती केलेल्या प्रस्तावित प्रस्तावातील अ.क्र.०१ ते २१ घड्याळी तासिका तत्वावरील माध्यमिक शिक्षकांना सन २०१८-२०१९ च्या शैक्षणिक वर्षातील प्रथम सत्रात प्रशासकीय मान्यतेने मा.स्थायी समितीच्या मान्यतेच्या अधिन राहून दि.१५/०६/२०१८ ते दि.१३/०७/२०१८, दि.१५/०७/२०१८ ते १२/०८/२०१८, दि.१४/०८/२०१८ ते १५/०८/२०१८ व दि.१८/०८/२०१८ ते १५/०९/२०१८ पर्यंत देण्यांत आलेल्या मुदतवाढीस कार्योत्तर मान्यता देण्यात येते. तसेच वरील अ.क्र.०१ ते २१ कर्मचाऱ्यांना सन २०१८-२०१९ च्या शैक्षणिक वर्षातील दर २९ दिवसांनी एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दिनांक १८/०९/२०१८ ते (दिवाळीच्या सुट्ट्या लागेपर्यंत) दिनांक ०३/११/२०१८ पर्यंतची मुदतवाढ देण्यास दुरूस्तीसह सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद मनपा मार्फत पडेगाव कत्तलखाना येथील गट क्र.६६/६७ येथे केंद्र शासनाच्या खाद्यान्न प्रक्रिया उद्योग मंत्रालयाच्या योजनेतंर्गत कत्तलखान्यासाठी राखीव असलेल्या ३६ एकर जागेपैकी १८ एकर जागेवर कत्तलखाने आधुनिकीकरण प्रकल्प हाती घेण्यात आलेला आहे.

औरंगाबाद महानगरपालिका अंतर्गत पडेगाव येथे मोठया जनावरांचा कत्तलखाना सन १९८५-८६ मध्ये कार्यान्वीत करण्यात आलेला आहे. यापुर्वी शहरातील मध्यवर्ती भाग मोहल्ला सिल्लेखाना येथे जनावरांचा कत्तलखाना कार्यरत होता. जागेची अडचण कत्तलखान्यामधून निर्माण होणारे प्रदूषण व दुर्गंधीमुळे मोहल्ला सिल्लेखाना येथिल जनावराची कत्तलखाना शहराबाहेर प्रशस्त जागी गट क्रं.-६६/६७ पडेगाव येथे स्थलांतरीत करण्यात आला आहे.

पडेगाव येथिल कत्तलखान्यावर जनावरांच्या कत्तलीसाठी सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या. त्यामध्ये १८ एक्कर मध्ये कत्तलखाना शेड, जनावरे बांधण्याकरिता शेड, कत्तलीपूर्वी पशुवैदयकीय तपासणी, पाणीपुरवठा पाण्याची टाकी, सांस्कृतिक सभागृह, चामडे गोदाम, हाडे गोदाम ईत्यादी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

सिल्लेखाना येथील अनधिकृत हाडे चामडे गोदाम पडेगाव परिसरात स्थलांतरीत करणेसाठी मनपामार्फत कत्तलखाना परिसरात व्यवसायिकांना खालीलप्रमाणे ०५ हाडे गोदाम व १८ चामडे गोदाम असे एकूण २३ गोदाम उपलब्ध करून देण्यात आले होते.

पडेगाव कत्तलखाना येथे १२ चामडे गोदाम मनपा मार्फत स्थायी समिती ठराव क्र.१६९/२ दि.४/११/९५ अन्वये बांधुन देण्यात आलेले आहेत. त्याची किंमत प्रत्येकी रू.१,१८,०००/- ठरविण्यात आलेली होती. सदर गोदाम धारकास त्यापैकी १५% रक्कम रू.१८,०००/- भरून उर्वरीत ८५% रक्कम रू.१ लक्ष चे समान ४० हप्ते करून सन २००९ पर्यंत दरमहा रू.२५००/- प्रमाणे भरणा करावयाचे होते. तथापी गोडावून धारकांनी वेळेत हप्ते न भरल्यामुळे मनपामार्फत त्यांना वारंवार नोटीसा देण्यात आल्या होत्या. त्याचा तपशिलवार पुढील प्रमाणे दर्शविण्यात येतो.

| अक्रं. | चामडे गोदाम धारकाचे नाव व नंबर | चामडे गोदामाची एकूण रक्कम रू.१,१८,०००/- पैकी भरलेली रक्कम | एकूण बाकी रक्कम | शेरा<br>उर्वरित रक्कम भरण्या करीता देण्यात आलेल्या नोटीसचे जाक्र/व दिनांक<br>२००७ ते २००९ पर्यंत |
|---|---|---|---|---|
| १ | मो.ईसा मो.शरिफ ०१ | रु.-३८०००/- | रू.८०,०००/- | एकूण ०७ वेळा नोटीस देण्यात आली |
| २ | शेख सत्तार शेख मोहंमद ०२ | रु.-२३०००/- | रू.९५,०००/- | एकूण ०६ वेळा नोटीस देण्यात आली |
| ३ | शेख अजिज शेख महेबुब ०३ | रु.-२३०००/- | रू.९५,०००/- | एकूण ०७ वेळा नोटीस देण्यात आली |
| ४ | शेख बशीर शेख मोहंमद ०४ | रु.-२८०००/- | रू.९००००/- | एकूण ०७ वेळा नोटीस देण्यात आली |
| ५ | मोहंमद उस्मान हाजी मोहंमद याकुब ०५ | रु.-२३०००/- | रू.९५,०००/- | एकूण ०८ वेळा नोटीस देण्यात आली |
| ६ | शेख गफुर शेख खाजामियां ०६ | रु.-३०५००/- | रू.८७५००/- | एकूण ०८ वेळा नोटीस देण्यात आली |
| ७ | मो.नसिर मो.याकुब ०७ | रु.-२३०००/- | रू.९५०००/- | एकूण ०८ वेळा नोटीस देण्यात आली |
| ८ | शेख दस्तगिर शेख अब्दुल रहेमान ०८ | रु.-१८०००/- | रू.१०००००/- | एकूण ०७ वेळा नोटीस देण्यात आली |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९ | हाजी मुख्तार हाजी ईसा ०९ | रु.-२८०००/- | रू.९००००/- | एकूण ०८ वेळा नोटीस देण्यात आली |
| १० | अब्दुल वहाब अब्दुल हसन १० | रु.-२५५००/- | रू.९२५००/- | एकूण ०८ वेळा नोटीस देण्यात आली |
| ११ | मो.अखील मो.खलील ११ | रु.-२०५००/- | रू.९७५००/- | एकूण ०८ वेळा नोटीस देण्यात आली |
| १२ | हाजी सलीम कुरैशी जिलानी | रु.-२८०००/- | रू.९००००/- | एकूण ०७ वेळा नोटीस देण्यात आली |

वरिल चामडे गोदाम धारकांनी मनपाने बांधून दिलेल्या चामडे गोदामाचा ताबा घेऊन आजतागयत वापर केला आहे. तथापी सद्यस्थितीत सर्व बांधकामे जिर्ण झाल्यामुळे वापरात नाहीत. फक्त ०१ चामडे गोदाम क्र.११ गोदामधारक श्री.अखील मो.खलील हे गोदाम दुरूस्ती करून वापरत आहेत.

तसेच कत्तलखाना परिसरातील ०६ भुखंड स्थायी समिती ठराव क्र.०९/०४ दि.९/६/९५ अन्वये प्रत्येकी रू.७०००/- भरणा करून चामडे गोदाम स्वखर्चाने बांधून घेण्यासाठी ताब्यात देण्यात आले होते. गोडावून धारकांनी विहीत वेळेत पुर्ण रक्कम भरलेली नाही. म्हणुन त्यांना गोदामाचा ताबा देण्यात आला परंतु करारनामा करून देण्यात आलेला नाही. तसेच रू.७०००/- किंमतीचे भुखंड, चामडे गोदाम स्वखर्चाने बांधण्याकरीता एकुण ०६ भुखंड देण्यात आलेले आहेत. त्यांनी त्यावर बांधकाम केलेले आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

| अ.क्र. | भुखंडधारकाचे नाव | भरलेली रक्कम | तपशील |
|---|---|---|---|
| १ | वहाब अब्दुल गणी | ७०००/- | गोडावून स्वतः बांधून वापरले |
| २ | वहाब अब्दुल गणी | ७०००/- | गोडावून स्वतः बांधून वापरले |
| ३ | वहाब अब्दुल गणी | ७०००/- | गोडावून स्वतः बांधून वापरले |
| ४ | वहाब अब्दुल गणी | ७०००/- | गोडावून स्वतः बांधून वापरले |
| ५ | मो.सलीम मो.शरीफ | ७०००/- | गोडावून स्वतः बांधून वापरले |
| ६ | अनीसोद्यीन उर्फ सब्बन कुरेशी | ७०००/- | गोडावून स्वतः बांधून वापरले |

वरिल चामडे गोदाम धारकांनी मनपाने दिलेल्या भुखंडावर स्वखर्चाने बांधून घेतलेल्या चामडे गोदामाचा ताबा घेऊन आजतागयत वापर केला आहे. तथापी सद्यस्थितीत जुने बांधकाम असून वापरात नाहीत.

तसेच मनपाने ०५ हाडे गोदाम बांधून देवून प्रती महा रू.२००/-प्रमाणे भाडेपट्टयाने खालील व्यावसायिकास वापरासाठी ताब्यात दिलेले होते. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | हाडे गोदामधारकाचे नाव | दर महा भाडे रू. | थकीत भाडे कालावधी (सन ३१/०३/२०१४ पर्यंत) | तपशील |
|---|---|---|---|---|
| १ | शेख ईस्माईल मो.याकुब | २००/- | १२ महिने | वसुली नोटीस दि.११/०८/२०१३ |
| २ | शेख महेबुब शेख रऊफ | २००/ | १३२ महिने | वसुली नोटीस दि.११/०८/२०१३ |
| ३ | नासेर अब्दुल रहेमान खान | २००/ | २५७ महिने | वसुली नोटीस दि.११/०८/२०१३ |
| ४ | शेख मलीक शेख लाल | २००/ | ४८ महिने | वसुली नोटीस दि.११/०८/२०१३ |
| ५ | नसीर कुरेशी याकुब कुरेशी | २००/ | १४५ महिने | वसुली नोटीस दि.११/०८/२०१३ |

सदर हाडे गोदाम २०१४ पासून वापरात नसून जिर्ण झाल्याने अर्धवट पडलेल्या स्थितीत आहेत व वापरात नाहीत.

पडेगाव कत्तलखाना आधुनिकीकरण प्रकल्पासाठी मनपामार्फत पीपीपी पार्टनर यांना १८ एकर जागा रिकामी करून (Vaccant Possession) देणे बाबत मनपामार्फत दि.२५/०१/२०१७ रोजी करारनामा करण्यात आला आहे. त्यानुसार सदर जागेवरील जुनी जिर्ण बांधकामे निष्काशीत करून रिकामी जागा पीपीपी पार्टनर यांना कत्तलखाना आधुनिकीकरण प्रकल्प उभारणीसाठी हस्तांतरीत करणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रकल्पाचे काम सुरू होऊन बंद पडले आहे. सदर जागेचा खुला ताबा देणेसाठी दि.१८/०४/२०१७ अन्वये मा.आयुक्त महोदय यांची व दि.०६/०९/२०१८ अन्वये मा.महापौर यांची मान्यता प्रदान केलेली आहे.

त्यानुसार मनपाने बांधून दिलेले १२ चामडे गोदाम, ०५ हाडे गोदाम व व्यवसायिकांनी स्वखर्चाने बांधून घेतलेले ०६ चामडे गोदाम असे एकूण २३ चामडे व हाडे गोदाम निष्काशित करून पीपीपी पार्टनर यांना १८ एकर जागा कत्तलखाना आधुनिकीकरण प्रकल्पाची उभारणी करण्यासाठी आवश्यक असल्याने व त्यामुळे प्रकल्पाचे काम थांबल्यामुळे पडेगाव कत्तलखाना येथील कत्तलखाना आधुनिकीकरण प्रकल्पासाठी पीपीपी पार्टनर मे.अल कुरेश एक्सपोर्टस लि. यांना प्रकल्प उभारणीसाठी देण्यात आलेल्या १८ एकर जागेच्या परिसरातील जुने चामडे गोदाम व हाडे गोदाम निष्काषित करून प्रकल्प उभारणीस १८ एकर जागा उपलब्ध करून देणेबाबत प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

श्री.गजानन बारवाल : विषय काय आहे याचा खुलासा झाला पाहिजे.

मा.सभापती : कत्तलखाना उभारण्याची प्रक्रिया कधी सुरु झाली होती, करारनामा झाला का, निविदा प्रक्रिया कधी झाली? त्याची पुर्ण माहिती द्यावी.

उपआयुक्त (महसुल) : सन १९८५-८६ ला जो सिल्लेखानाचा कत्तलखाना होता तो पडेगावला शिफ्ट केला. तिथे महानगरपालिकेतर्फे गोडाऊन बांधुन देण्यात आले आहे. केंद्र शासनाच्या पुल प्रोसेसिंग कार्यालयाच्या मार्फत कत्तलखाना अनुधिकणाचा जो प्रकल्प आहे तो महानगरपालिकेने हाती घेतला. सन २०१४-१५ मध्ये ॲग्रीमेन्ट होऊन कार्यादेश देण्यात आले आहे. तीन वर्ष हा प्रकल्प रेंगाळला आहे. त्या ॲग्रीमेन्ट मध्ये असे लिहिलेले होते की, मॅथड पजिशन महानगरपालिकेने द्यावे.

मा.सभापती : या चार वर्षामध्ये अनेकवेळा निष्काशित करा म्हणुन सांगितले होते. लेखी स्वरुपात पत्र व्यवहार झाला होता तरी कार्यवाही २०१८ पर्यंत का रखडली.

श्रीमती.शिल्पाराणी वाडकर : यामध्ये अतिक्रमण विभाग जबाबदार नाही का?

मा.सभापती : या चार वर्षामध्ये श्री.नाईकवाडे यांना निलंबित केले म्हणजे हे चार वर्ष भरुन निघाले असे प्रशासनाचे म्हणणे आहे का?

श्रीमती.शिल्पाराणी वाडकर : श्री.नाईकवाडे यांनी कत्तलखाना बाबत काय लेखी खुलासा दिलेला आहे तो सभागृहात दाखविण्यात यावा.

श्रीमती.राखी देसरडा : हा प्रस्ताव शहराच्या शांतता व सुव्यवस्था राहावी म्हणून अतिशय महत्वाचा विषय आहे. शहराच्या मध्यभागी असलेला सिल्लेखाना भागात जनावरांची कत्तल होऊ नये यासाठी पडेगाव येथे आधुनिक तत्वावर कत्तलखाना उभारण्यासाठी दि.२५.०१.२०१८ रोजी सेंट्रल गव्हर्नमेंट व राज्य सरकारकडुन तो निधी प्राप्त झाला आहे. त्यातुन १८ एकर वर कत्तलखान्याचे आधुनिकरण प्रकल्पासाठी पी.पी.पी तत्वावर पाटनर मे.अलकुरेशी इंन्टरप्रायजेस सोबत करारनामा करण्यात आला आहे. परंतु आज रोजी पर्यंत संबंधीत एजंन्सीला जागा हस्तांतर करण्यात आलेली नाही असे प्रस्तावातून दिसून येत आहे. त्यामुळे आधुनिक कत्तलखाण्यासाठी येणाऱ्या निधीचा वापर झालेला नाही. संबंधीत जागेवर महापालिकेने दि.०४.११.१९९५ रोजी १२ चमड्याचे गोडावून व ५ हाडाचे गोडावून व इतर ६ गोडावून असे एकुण २३ गोडावून भाडे तत्वावर मनपाने संबंधीत जागेवर दिलेले आहे. काही गोडावूनला भाडे करारनामा सुध्दा केलेला नाही. या प्रस्तावावर

मा.आयुक्तांचे काय मत आहे स्पष्टपणे कुठेही नमुद केलेले दिसून येत नाही. त्या गोडावून धारकांनी मनपाचे भाडेही दिले नाही व त्यामुळे आधुनिक कत्तलखान्याचे काम सुरु करु शकले नाही. या प्रस्तावात झालेली दिरंगाई व मनपाचा झालेला आर्थिक तोटा ज्या अधिकाऱ्यामुळे झालेला आहे यांची पूर्ण चौकशी व्हावी व तसा अहवाल येणाऱ्या स्थायी समितीत देण्यात यावा या अटीवर प्रस्ताव मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती : यामध्ये त्यांच्याकडुन भाडे वसुली केलेले नाही. त्या परिस्थितीमध्ये कुठल्या अधिकाऱ्याकडे याची जबाबदारी होती ते बघायला पाहिजे. या चार वर्षामध्ये ज्यांच्याकडे प्रकल्पाची जबाबदारी होती, ज्यांच्यामुळे उशिर झाला याचा सविस्तर अहवाल येणाऱ्या स्थायी समितीमध्ये आला पाहिजे. आणि पी.पी.पी वर हा प्रोजेक्ट करत असतांना याचा करारनामा त्या काळात झालेला आहे. त्याची सुध्दा प्रत १५ दिवसांमध्ये स्थायी समितीच्या सर्व सदस्यांना मिळाली पाहिजे. या सर्व अटी वर प्रस्तावाला मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद मनपा मार्फत पडेगाव कत्तलखाना येथील गट क्र.६६/६७ येथे केंद्र शासनाच्या खाद्यान्न प्रक्रिया उद्योग मंत्रालयाच्या योजनेतंर्गत कत्तलखान्यासाठी राखीव असलेल्या ३६ एकर जागेपैकी १८ एकर जागेवर कत्तलखाने आधुनिकीकरण प्रकल्प हाती घेण्यात आलेला आहे. त्यानुसार मनपाने बांधून दिलेले १२ चामडे गोदाम, ०५ हाडे गोदाम व व्यवसायिकांनी स्वखर्चाने बांधून घेतलेले ०६ चामडे गोदाम असे एकूण २३ चामडे व हाडे गोदाम निष्काशित करून पीपीपी पार्टनर यांना १८ एकर जागा कत्तलखाना आधुनिकीकरण प्रकल्पाची उभारणी करण्यासाठी आवश्यक असल्याने व त्यामुळे प्रकल्पाचे काम थांबल्यामुळे पडेगाव कत्तलखाना येथील कत्तलखाना आधुनिकीकरण प्रकल्पासाठी पीपीपी पार्टनर मे.अल कुरेश एक्सपोर्टस लि. यांना प्रकल्प उभारणीसाठी देण्यात आलेल्या १८ एकर जागेच्या परिसरातील जुने चामडे गोदाम व हाडे गोदाम निष्काषित करून प्रकल्प उभारणीस १८ एकर जागा उपलब्ध करून देणेस तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार यामध्ये त्यांच्याकडुन भाडे वसुली केलेले नाही. त्या परिस्थितीमध्ये कुठल्या अधिकाऱ्याकडे याची जबाबदारी होती ते बघायला पाहिजे. या चार वर्षामध्ये ज्यांच्याकडे प्रकल्पाची जबाबदारी होती, ज्यांच्यामुळे उशिर झाला याचा सविस्तर अहवाल येणाऱ्या स्थायी समितीमध्ये आला पाहिजे. आणि पी.पी.पी वर हा प्रोजेक्ट करत असतांना याचा करारनामा त्या काळात झालेला आहे. त्याची सुध्दा प्रत १५ दिवसांमध्ये स्थायी समितीच्या सर्व सदस्यांना मिळाली पाहिजे. या सर्व अटी वर प्रस्तावाला सर्वानुमते मंजुरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२२ :**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, डॉ.संध्या गोपाळ टाकळीकर, वैद्यकीय अधिकारी, आरोग्य विभाग महानगरपालिका, औरंगाबाद यांनी त्यांच्या पतीच्या नामे डॉ.सुहास लक्ष्मण जेवळीकर Acute Calcus Cholecystitis with Acute pain in Abdemen with Diabetic Ketoacidosis with HTN/CKD (तीव्र उदर वेदना, रक्तदाब) या गंभीर आजारावर शासन मान्य खाजगी रूग्णालय युनाईटेड सिग्मा हॉस्पीटल, औरंगाबाद येथे उपचार केलेला असून रक्कम रूपये ४,२७,७३७/- (चार लाख सत्तावीस हजार सातशे सदतीस रूपये फक्त) इतका खर्च केला आहे.

अर्जदाराने आवश्यक विहीत नमुन्यात माहितीसह सर्व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केलेली असून त्यांना तीव्र उदर वेदना, रक्तदाब Acute Calcus Cholecystitis with Acute pain in Abdemen with Diabetic Ketoacidosis with HTN/CKD उपचारार्थ एकूण केलेला खर्च रक्कम रू.४,२७,७३७/- इतका झाला असून त्यापैकी अनुज्ञेय नसलेली रक्कम रू.४४,५४९/- वजा जाता रू.३,८३,१८८/- शिल्लक राहते. शिल्लक रक्कमेच्या ९०% रू.३,४४,८६९/- इतकी होते. एकूण खर्चाच्या ५% रक्कम रू.२१,३८६/- ही मनपा फंडात जमा करून मंजूर देय रक्कम रू.३,२३,४८३/- संबंधीतास अदा करावयाची आहे.

संबंधीताने उपचार युनाईटेड सिग्मा हॉस्पीटल, औरंगाबाद हे महाराष्ट्र शासन निर्णय क्र.सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.२०१४/प्र.क्र.२९२/१४/राकावि-२/मंत्रालय,मुंबई-३२ दिनांक १९ एप्रिल २०१८ अन्वये शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटूंबीयांनी खाजगी रूग्णालयात घेतलेल्या गंभीर व विशिष्ट खर्चावरील शासकीय रूग्णालयाप्रमाणे प्रतिपुर्ती अनुज्ञयतेसाठी शासन मान्यता दिलेल्या खाजगी रूग्णालयाच्या अद्यावत यादीत सदरच्या रूग्णालयाचे नांव समाविष्ट आहे. सदरच्या प्रस्तावास पडताळणी करून वैद्यकीय प्रतिपूर्तीसाठी आरोग्य वैद्यकीय अधिकाऱ्यांनी शिफारस केलेली आहे.

करीता डॉ.संध्या गोपाळ टाकळीकर, वैद्यकीय अधिकारी, आरोग्य विभाग महानगरपालिका, औरंगाबाद यांना प्रत्यक्ष अनुज्ञेय असलेल्या रू.३,२३,४८३/- (तीन लाख तेवीस हजार चारशे त्र्याऐंशी रूपये फक्त) संबंधीताच्या वैद्यकीय खर्चास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या विचारार्थ व मान्यतेस्तव सविनय सादर.

मा.सभापती : विषय क्र.१२२,१२३,१२४,१२५,१२६ मंजुर करण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, डॉ.संध्या गोपाळ टाकळीकर, वैद्यकीय अधिकारी, आरोग्य विभाग महानगरपालिका, औरंगाबाद यांनी त्यांच्या पतीच्या नामे डॉ.सुहास लक्ष्मण जेवळीकर Acute Calcus Cholecystitis with Acute pain in Abdemen with Diabetic Ketoacidosis with HTN/CKD (तीव्र उदर वेदना, रक्तदाब) या गंभीर आजारावर शासन मान्य खाजगी रूग्णालय युनाईटेड सिग्मा हॉस्पीटल, औरंगाबाद येथे उपचारार्थ सादर केलेल्या एकूण खर्च रक्कम रू.४,२७,७३७/- त्यापैकी अनुज्ञेय नसलेली रक्कम रू.४४,५४९/- वजा जाता रू.३,८३,१८८/- शिल्लक राहते, शिल्लक रक्कमेच्या ९०% रू.३,४४,८६९/- व एकूण खर्चाच्या ५% रक्कम रू.२१,३८६/- ही मनपा फंडात जमा करून मंजूर देय रक्कम रू.३,२३,४८३/- संबंधीतास अदा करणेसह संबंधीताच्या वैद्यकीय खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येत आहे की, श्री.नाथा लक्ष्मण चव्हाण (मयत) कार्यालय अधिक्षक यांना त्यांच्या जीभेच्या कर्करोग (CA Tongue) या आजारपणावर उपचारासाठी खर्च केलेल्या वैद्यकीय देयकांपैकी अनुज्ञेय वैद्यकीय खर्चाची रक्कम रू.१,३७,१०४/- + रू.१,७३,४७७/- + रू.३,७३,२७७/- रक्कम असे एकूण रू.६,८३,८५८/- या वैद्यकीय खर्चास दि.१४/११/२०१७ रोजी संपन्न झालेल्या मा.स्थायी समितीने ठराव क्र.१७० नुसार मंजुरी दिलेली असून त्यानुसार संबंधीतास एकूण रू.६,८३,८५८/- (अक्षरी रू.सहा लाख त्र्याऐंशी हजार आठशे अठ्ठावण्ण मात्र) अदा करण्यात आलेले आहे.

तथापी श्री.नाथा लक्ष्मण चव्हाण यांनी दि.२०/११/२०१७ रोजी अर्ज देवून त्यांच्या उक्त आजारपणावर उपचारासाठी (दि.१२/०६/२०१७ ते दि.२५/०७/२०१७ पर्यंत खर्चाचे देयके) खर्च केलेल्या वैद्यकीय देयकांपैकी अनुज्ञेय रू.८,८७,६२२/- च्या ९० टक्के रक्कम रू.७,९८,८५९/- (अक्षरी रू.सात लाख अठ्ठ्यान्नव हजार आठशे एकोणसाठी मात्र) पैकी ५ टक्के रक्कम रू.५०,२२८/- (अक्षरी रू.पन्नास हजार दोनशे अठ्ठावीस मात्र) (एकूण दाखल केलेले देयके रक्कम रू.१०,०४,५७६/- च्या ५ टक्के प्रमाणे) मनपा फंडात जमा करून उर्वरीत रक्कम रू.७,४८,६३१/- (अक्षरी रू.सात लाख अठ्ठेचाळीस हजार सहाशे एकतीस मात्र) मान्यता देण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.नाथा लक्ष्मण चव्हाण (मयत) कार्यालय अधिक्षक यांना त्यांच्या जीभेच्या कर्करोग (CA Tongue) या आजारपणावर उपचारासाठी खर्च केलेल्या वैद्यकीय देयकांपैकी अनुज्ञेय वैद्यकीय खर्चाची रक्कम रू.१,३७,१०४/- + रू.१,७३,४७७/- + रू.३,७३,२७७/- रक्कम असे एकूण रू.६,८३,८५८/- या वैद्यकीय खर्चास दि.१४/११/२०१७ रोजी संपन्न झालेल्या मा.स्थायी समितीने ठराव क्र.१७० नुसार मंजुरी दिलेली असून त्यानुसार संबंधीतास एकूण रू.६,८३,८५८/- (अक्षरी रू.सहा लाख

त्र्याऐंशी हजार आठशे अठ्ठावण्ण मात्र) अदा करण्यात आलेले आहे. तथापी श्री.नाथा लक्ष्मण चव्हाण यांनी दि.२०/११/२०१७ रोजी अर्ज देवून त्यांच्या उक्त आजारपणावर उपचारासाठी (दि.१२/०६/२०१७ ते दि.२५/०७/२०१७ पर्यंत खर्चाचे देयके) खर्च केलेल्या वैद्यकीय देयकांपैकी अनुज्ञेय रू.८,८७,६२२/- च्या ९० टक्के रक्कम रू.७,९८,८५९/- (अक्षरी रू.सात लाख अठ्ठ्यान्नव हजार आठशे एकोणसाठी मात्र) पैकी ५ टक्के रक्कम रू.५०,२२८/- (अक्षरी रू.पन्नास हजार दोनशे अठ्ठावीस मात्र) (एकूण दाखल केलेले देयके रक्कम रू.१०,०४,५७६/- च्या ५ टक्के प्रमाणे) मनपा फंडात जमा करून उर्वरीत रक्कम रू.७,४८,६३१/- (अक्षरी रू.सात लाख अठ्ठेचाळीस हजार सहाशे एकतीस मात्र) यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२४ :**

विषय :- वार्ड क्र.३५ नारेगाव आनंद गाडेनगर झिने बाई यांच्या घरापासून ते अण्णाभाऊ साठे चौक ते जुबेदा शेख नबी यांच्या घरापर्यंत ट्रिमिक्स काँक्रीट रस्ता तयार करणे, या कामाचे ठेकेदार मे.सहारा कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने म्हणजेच टेंडर र.रु.२५,९१,४२५/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : दरपत्रक (Close Offer)

| | | |
|---|---|---|
| १ | खात्याचे नांव | उप अभि झोन क्र.०५, सिडको |
| २ | कामाचे स्वरुप | वार्ड क्र.३५ नारेगाव आनंद गाडेनगर झिने बाई यांच्या घरापासून ते अण्णाभाऊ साठे चौक ते जुबेदा शेख नबी यांच्या घरापर्यंत ट्रिमिक्स काँक्रीट रस्ता तयार करणे. |
| ३ | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | मा.स्थायी समिती सभा दिनांक २८/०२/२०१७ विषय क्र.१३७ र.रू.२७,२०,९९७/- |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | र.रू.२५,९१,४२५/- |
| ४ | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नांवे व प्रसिध्दीचा दिनांक | --- |
| ५ | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | २७/११/२०१७ |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | २०/१२/२०१७ |
| ६ | एकूण किती टेंडर्स आली? | एक |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| ०१. | मे.सहारा कन्स्ट्रक्शन | र.रू.२५,९१,४२५/- | अंदाजपत्रकीय दराने |

| | | |
|---|---|---|
| ७ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | नाही |
| ८ | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | नविन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| ९ | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | नाही |
| १० | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | आहे. |
| तरी विषयांकित काम ठेकेदार मे.सहारा कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने म्हणजेच टेंडर र.रु.२५,९१,४२५/- पर्यंत करुन घेणेस अधिक टेंडर अटी /शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर. | | |

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.३५ नारेगाव आनंद गाडेनगर झिने बाई यांच्या घरापासून ते अण्णाभाऊ साठे चौक ते जुबेदा शेख नबी यांच्या घरापर्यंत ट्रिमिक्स कॉंक्रीट रस्ता तयार करणे, या कामासाठी प्राप्त झालेल्या दरपत्रकानुसार (Close Offer) या कामाचे ठेकेदार मे.सहारा कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने म्हणजेच टेंडर र.रु.२५,९१,४२५/- पर्यंत सदर काम करुन घेणेस अधिक टेंडर अटी / शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. १२५ :</u>**

विषय :- वार्ड क्र.७७ जवाहर कॉलनी अंतर्गत डॉ.बाबासाहेब आंबेडकर वाचनालय ते त्रिमुर्ती अपार्टमेंट व लगतचे रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे व पेव्हर ब्लॉक बसविणे या कामाचे ठेकेदार मे.श्री.कासलीवाल कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदापत्रकीय दरापेक्षा ५.२७ टक्के कमी दराने म्हणजेच टेंडर र.रु.३५,७५,७१७.००/- पर्यंत करून घेणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : टेंडर आय.डी.क्र.२०१८-AMCA-290921-२ सन २०१८-२०१९

| | | |
|---|---|---|
| १ | खात्याचे नांव | कार्यकारी अभियंता-१ |
| २ | कामाचे स्वरुप | वार्ड क्र.७७ जवाहर कॉलनी अंतर्गत डॉ.बाबासाहेब आंबेडकर वाचनालय ते त्रिमुर्ती अपार्टमेंट व लगतचे रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे व पेव्हर ब्लॉक बसविणे. |
| ३ | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | मा.स्थायी समिती मान्यता ठराव विषय क्र.२२९ दि.११/०१/१८ र.रू.३७,७५,०००/- |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | र.रू.३७,७४,६४०.२५ |

| | | |
|---|---|---|
| ४ | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नांवे व प्रसिध्दीचा दिनांक | महा-ई-टेंडर |
| ५ | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | ०७/०३/२०१८ ते ०२/०४/२०१८ |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | ०५/०४/२०१८ |
| ६ | एकूण किती टेंडर्स आली? | चार |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| ०१. | श्री.कासलीवाल कन्स्ट्रक्शन | ३७७४६४०.२५ | ५.२७ टक्के कमी दराने |
| ०२. | खुशी कन्स्ट्रक्शन | ३७७४६४०.२५ | ३.२७ टक्के कमी दराने |
| ०३. | पी.एस.टेंभुर्णीकर | ३७७४६४०.२५ | ३.०० टक्के कमी दराने |
| ०४. | कासलीवाल इन्फ्राटेक | ३७७४६४०.२५ | २.०० टक्के कमी दराने |

| | | |
|---|---|---|
| ७ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| ८ | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | नविन कॉंक्रीट रस्ते |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| ९ | सदर काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| १० | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | होय. |
| तरी विषयांकित प्रकरणी ठेकेदार मे.श्री.कासलीवाल कन्स्ट्रक्शन यांनी ५.२७ टक्के कमी दराने निविदा दाखल केली होती. अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५.२७ टक्के कमी म्हणजेच टेंडर र.रु.३५,७५,७१७.००/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच स्टार रेटनुसार दरातील फरक काढून देयक अदा करणे व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर. | | |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.७७ जवाहर कॉलनी अंतर्गत डॉ.बाबासाहेब आंबेडकर वाचनालय ते त्रिमुर्ती अपार्टमेंट व लगतचे रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे व पेव्हर ब्लॉक बसविणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक ठेकेदार मे.श्री.कासलीवाल कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदापत्रकीय दरापेक्षा ५.२७ टक्के कमी दराने म्हणजेच टेंडर र.रु.३५,७५,७१७.००/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच स्टार रेटनुसार दरातील फरक काढून देयक अदा करणे व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२६ :**

विषय :- वार्ड क्र.३५ नारेगांव अंतर्गत भाटनगर आंबेडकर पुतळा मागील वसाहत व गल्ली क्र.०६,०७,०८ व मदिना मस्जिद ते रोहनराज ड्रेसेस पर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे. या कामाचे ठेकेदार मे.महाराष्ट्र कन्स्ट्रक्शन कंपनी यांचेकडून अंदापत्रकीय दरापेक्षा ०.९९ टक्के कमी दराने म्हणजेच टेंडर र.रु.४०,५९,००२/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : टेंडर आय.डी.क्र.२०१८-AMCA-287626-१

| | | |
|---|---|---|
| १ | खात्याचे नांव | उपअभि. झोन क्र.०५, सिडको |
| २ | कामाचे स्वरुप | वार्ड क्र.३५ नारेगांव अंतर्गत भाटनगर आंबेडकर पुतळा मागील वसाहत व गल्ली क्र.०६,०७,०८ व मदिना मस्जिद ते रोहनराज ड्रेसेस पर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे. |
| ३ | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | मा.स्थायी समिती सभा दि.०७/०२/२०१८ विषय क्र.२८७, र.रू.४०,९९,५८८/- |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | र.रू.४०,९९,५८८/- |
| ४ | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नांवे व प्रसिध्दीचा दिनांक | --- |
| ५ | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | २२ मार्च २०१८ |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | २६ मार्च २०१८ |
| ६ | एकूण किती टेंडर्स आली? | तीन (०३) |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| ०१. | मे.महाराष्ट्र कन्स्ट्रक्शन कंपनी | र.रू.४०,५९,००२/- | अं.प.दरापेक्षा ०.९९ टक्के कमी दराने |
| ०२. | मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन | र.रू.४१,४०,५८४/- | अं.प.दरापेक्षा १.०० टक्के जास्त दराने |
| ०३. | मे.स्टार कन्स्ट्रक्शन कंपनी | र.रू.४१,६१,०८२/- | अं.प.दरापेक्षा १.५० टक्के जास्त दराने |

| | | |
|---|---|---|
| ७ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| ८ | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | नविन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| ९ | सदर काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | नाही |
| १० | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | होय. |

तरी विषयांकित काम ठेकेदार मे.महाराष्ट्र कन्स्ट्रक्शन कंपनी यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.९९ टक्के कमी दराने म्हणजेच टेंडर र.रु.४०,५९,००२/- पर्यंत करुन घेणेस अधिक टेंडर अटी/ शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.३५ नारेगांव अंतर्गत भाटनगर आंबेडकर पुतळा मागील वसाहत व गल्ली क्र.०६,०७,०८ व मदिना मस्जिद ते रोहनराज ड्रेसेस पर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक ठेकेदार मे.महाराष्ट्र कन्स्ट्रक्शन कंपनी यांचेकडून अंदापत्रकीय दरापेक्षा ०.९९ टक्के कमी दराने म्हणजेच टेंडर र.रु.४०,५९,००२/- पर्यंत काम करुन घेणेस अधिक टेंडर अटी/ शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

श्रीमती.राखी देसरडा : सिल्लेखाना चौकामध्ये कब्रस्तानाची जागा आहे. तिथे होर्डीग लावण्यात आले आहे.

मा.सभापती : ती जागा कब्रस्तानच्या मुळ मालकाने महापालिकेला कब्रस्तानसाठी स्वखुशीने दिलेली आहे. असे असतांना त्या भागामध्ये उंच-उंच होर्डिंग्स लावलेले आहे. त्यावर लाखो रुपये समोरचे लोक कमवत आहे. त्याचे उत्पन्न महापालिकेला होत नाही. या विषयात जे कोणी संबंधीत असतील त्यांचेवर गुन्हा दाखल करावा.

श्रीमती.राखी देसरडा : रस्त्यावरील दुभाजकाला दिलेली निविदा त्यावर जे होर्डिंग्स असतात त्याचा काय करारनामा झालेला आहे.

मा.सभापती : श्रीमती.करपे मॅडप आपण याबाबतीत काय करारनामा झालेला आहे त्याची प्रत स.नगरसेविकांना द्यावी.

श्रीमती.राखी देसरडा : मनपाच्या शासनाच्या आलेला निधी समांतर जलवाहिनीकडुन हस्तांतर झालेल्या फाईल परत देण्यात यावी.

मा.सभापती : श्री.कोल्हे याची काय माहिती आहे ती पुढच्या बैठकी पर्यंत द्यावी.

श्री.गजानन बारवाल : भुमिगत गटार योजने बाबतीतची माहिती देण्यात यावी.

मा.सभापती : श्री.अफसर सिद्दिकी आपण भुमिगतच्या बाबतीत काय निर्णय घेत आहोत या संदर्भात एक टिपणी पुढच्या बैठकीच्या अगोदर द्यावी.

## ऐनवेळचे विषय

**विषय क्र. १२७ :**

मा.आयुक्त यांच्या मान्यतेने प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शिक्षण विभागात कार्यरत असलेल्या रितसर प्रक्रियेने भरती केलेल्या घडयाळी तासिका तत्वावरील माध्यमिक शिक्षकांना मा. स्थायी समिती मंजूर ठराव क्र.२०९, दिनांक ११/०१/२०१८ नुसार जा.क्र.मनपा/शिक्षण/२०१८/५५, दिनांक २५/०१/२०१८ रोजीच्या आदेशान्वये दिनांक ०६/११/२०१८ ते उन्हाळयाच्या सुट्टया लागेपर्यंत दिनांक ३०/०४/२०१८ पर्यंत तात्पुरती मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

सद्यस्थितीत खालील रितसर प्रक्रियेने भरती केलेले तासिका तत्वावरील माध्यमिक शिक्षक कार्यरत आहेत.

| अ.क्र. | शाळेचे नाव | तासिका त.मा.शिक्षकाचे नाव | शैक्षणिक पात्रता | अध्यापनाचे विषय | एक महिन्याच्या कमाल तासिका | प्रति तास मानधन |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | मा.वि. बेगमपुरा | श्रीमती तेहरीम शे. बाबर | बी.एस्सी.बी.एड . | गणित | ७२ तास | रु.९०/- |
| २. | मा. वि. बनेवाडी | श्री. संघवी रविंद्रकुमार जिनदास | बी.एस्सी.बी.एड . | विज्ञान | ७२ तास | रु.९०/- |
| ३. | मा.वि. हर्सुल | श्री. हिरेकर सुनिल दौलतराव | बी.एस्सी.बी.एड. | गणित | ७२ तास | रु.९०/- |
| ४. | मा.वि. किराडपुरा नं.१ | श्रीमती शे.मावीया तबस्सुम शे. नजमुद्दिन | बी.एस्सी.बी.एड . | गणित | ७२ तास | रु.९०/- |
| ५. | मा.वि. किराडपुरा नं.१ | श्रीमती सय्यदा शाहीन अंजुम तौफिक अली | बी.ए .बी.एड . | इतिहास सा. शास्त्रे | ७२ तास | रु.९०/- |
| ६. | मा.वि.हर्सुल | श्रीमती पवार किरण भारत | बी.एस्सी.बी.एड . | विज्ञान | ७२ तास | रु.९०/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ७. | मा.वि.सिडको एन-७ | श्रीमती राठोड मंजूश्री गणपतराव | बी.एस्सी.बी.एड . | गणित | ७२ तास | रु.९०/- |
| ८. | मा.वि.सिडको एन-७ | श्रीमती देशमुख वैशाली दिनकर | बी.एस्सी.बी.एड . | विज्ञान | ७२ तास | रु.९०/- |
| ९. | मा.वि.इंदिरानगर बायजीपुरा | श्री.उमेश अशोक गायकवाड | बी.ए.बी.एड . | मराठी | ७२ तास | रु.९०/- |
| १०. | मा.वि.नारेगाव मराठी | श्रीमती पाटील वैशाली कैलास | बी.ए.बी.एड . | मराठी | ७२ तास | रु.९०/- |
| ११. | मा. वि.चिकलठाणा | श्री.पठाण जाहेद खान साहेब खान | बी.ए.बी.एड . | हिंदी | ७२ तास | रु.९०/- |
| १२. | मा.वि.मुकुंदवाडी | श्रीमती ढोबळे राखी राम | बी.एस्सी.बी.एड . | गणित | ७२ तास | रु.९०/- |
| १३. | मा.वि. चिकलठाणा | श्रीमती मनिषा बळीराम शिंदे | बी.एस्सी.बी.एड . | विज्ञान | ७२ तास | रु.९०/- |
| १४. | मा.वि.हर्सुल | श्रीमती कुऱ्हाडे सुमन संतोष | बी.एस्सी.बी.एड . | गणित | ७२ तास | रु.९०/- |
| १५. | मा.वि.प्रियदर्शनी इंदिरानगर | श्रीमती चौधरी संगीता लक्ष्मण | बी.एस्सी.बी.एड . | विज्ञान | ७२ तास | रु.९०/- |
| १६. | मा.वि.बन्सीलालनगर | श्री. काकडे राहिदास मुरलीधर | बी.एस्सी.बी.एड . | गणित | ७२ तास | रु.९०/- |
| १७. | मा.वि.मिटमिटा | श्री.नन्नावरी श्रीकांत सोमकांत | बी.एस्सी.बी.एड . | गणित | ७२ तास | रु.९०/- |
| १८. | मा.वि.बनेवाडी | श्री. उन्हाळे प्रकाश भगवान | बी.ए.बी.एड . | इंग्रजी | ७२ तास | रु.९०/- |
| १९. | मा.वि.बनेवाडी | श्री. भुतेकर भाग्येश्वर श्रीकिशन | बी.ए.बी.एड . | मराठी | ७२ तास | रु.९०/- |
| २०. | मा.वि.इंदिरानगर बायजीपुरा | श्रीमती वामन सरीता रामकृष्ण | बी.ए.बी.एड | इंग्रजी | ७२ तास | रु.९०/- |
| २१. | मा.वि.इंदिरानगर बायजीपुरा | श्रीमती जंजाळ उज्वला परसराम | बी.एस्सी.बी.एड . | विज्ञान | ७२ तास | रु.९०/- |
| २२. | मा.वि.इंदिरानगर बायजीपुरा | श्रीमती रेखा दशरथ महाजन | बी.एस्सी.बी.एड . | गणित | ७२ तास | रु.९०/- |

उपरोक्त सर्व घडयाळी तासिका तत्वावरील माध्यमिक शिक्षकांना रु.९०/- प्रती घडयाळी तास याप्रमाणे मानधन अदा करण्यात येते. सदर मानधन खुप तुटपुंजे असल्याने मानधन वाढीबाबत वारंवार मागणी होत आहे. त्यामुळे संबंधितांच्या मानधनात रु.१८०/- प्रती घडयाळी तास याप्रमाणे मानधन वाढ करण्यास प्रशासकीय मान्यता झाली आहे. त्याबाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समितीसमोर ठेवण्यात आलेला आहे. मान्यता

असल्यास दि.१८/०९/२०१८ पासून रु.१८०/- प्रति घडयाळी तास प्रमाणे मुदतवाढ करणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

वरीलप्रमाणे कमाल तासांची मर्यादा ठरवुन दिलेली आहे. त्यापेक्षा कोणत्याही घडयाळी तासिका तत्वावरील माध्यमिक शिक्षकांचे जास्तीचे मानधन अदा केले जाणार नाही ,याची जबाबदारी संबंधित मुख्याध्यापक यांची राहील. याशिवाय शिक्षकांनी काही अतिरिक्त तास घेतल्यास त्याची स्वतंत्र नोंद मुख्याध्यापक हे ठेवतील व तशी शिक्षणाधिकारी यांची मान्यता घेतल्यानंतरच मानधन अदा करण्यात येईल.

वरील कर्मचाऱ्यांना सन २०१८-१९ च्या शैक्षणिक वर्षातील प्रथम सत्रात प्रशासकिय मान्यतेने मा. स्थायी समितीच्या मान्यतेच्या अधिन राहून दि.१५/०६/२०१८ ते दि.१५/०८/२०१८ व दि.१६/०८/२०१८ ते दि.१५/०९/२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

वरील कर्मचाऱ्यांना सन २०१८-१९ च्या शैक्षणिक वर्षातील दिनांक १८/०९/२०१८ ते दिवाळीच्या सुट्टया लागेपर्यंत दिनांक ०३/११/२०१८ पर्यंतची मुदतवाढ देण्याबाबतचा तसेच उपरोक्त मुदतवाढीस कार्योत्तर मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शिक्षण विभागात कार्यरत असलेल्या रितसर प्रक्रियेने भरती केलेल्या प्रस्तावित प्रस्तावातील अ.क्र.०१ ते २२ घडयाळी तासिका तत्वावरील माध्यमिक शिक्षकांना सन २०१८-१९ च्या शैक्षणिक वर्षातील प्रथम सत्रात प्रशासकिय मान्यतेने मा.स्थायी समितीच्या मान्यतेच्या अधिन राहून दि.१५/०६/२०१८ ते दि.१५/०८/२०१८ व दि.१६/०८/२०१८ ते दि.१५/०९/२०१८ पर्यंत देण्यांत आलेल्या मुदतवाढीस कार्योत्तर मान्यता देण्यात येते. तसेच वरील अ.क्र.०१ ते २२ कर्मचाऱ्यांना सन २०१८-१९ च्या शैक्षणिक वर्षातील दिनांक १८/०९/२०१८ ते दिवाळीच्या सुट्टया लागेपर्यंत दिनांक ०३/११/२०१८ पर्यंतची मुदतवाढ देण्यास दुरूस्तीसह सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच राष्ट्रगीताने सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**(दिलीप सुर्यवंशी)**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद